# विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/युवारंग-३३/ **१९०** /२०२६ दि.१०/१०/२०२६

## कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकीका - २०२६

प्रति,
**मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांना -**

**विषय:-** कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा सहभागाबाबत..
**संदर्भ:-** जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि/आमयुम-३३/१८६/२०२६, दि. ०८.१०.२०२६

महोदय/ महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्न क्षेत्रात पदवी- पदव्युत्तर अभ्यासक्रमात नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या सुप्त कलागुणांना व अभिनय क्षमतेला अधिक बाब देण्यासाठी रंगभूमीचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी दरवर्षी कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते.

या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पहाता, विद्यार्थी विकास मंडळाच्या दि. २२ जून २०२६ रोजीच्या प्रथम सभेत सदरची एकांकिका स्पर्धा युवारंग महोत्सवातच घेण्यात यावी असे ठरलेले आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आंतर महाविद्यालय युवक महोत्सवाचे आयोजन दि. २७ ते ३१ ऑक्टोंबर, २०२६ या कालावधीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे करण्यात येत आहे. या महोत्सवातच कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

त्याकरीता या स्पर्धेची नोंदणी युवारंग-२०२६ च्या दिलेल्या ऑनलाईन नोंदणीतच करावयाची आहे.

### * स्पर्धा नियम *

१) किमान ४ संघ सहभागी झाल्यावरच ही स्पर्धा घेण्यात येईल.
२) या स्पर्धेत एका महाविद्यालयाचे कमीत कमी २ आणि जास्तीत जास्त ९ कलावंत भाग घेवू शकतील.
३) सादरीकरणाचा एकूण कालावधी किमान २५ मिनिटे आणि जास्तीत जास्त ३० मिनिटे असेल.
४) रंगमंचावर देखावा (सेट) उभारणे व प्रकाश योजना करण्याची १० मिनिटांचा व एकांकिका संपल्यानंतर देखावा व प्रकाश योजना काढून घेण्यासाठी ५ मिनिटांचा कालावधी दिला जाईल.
५) सहकलाकरांची संख्या जास्तीत जास्त ३ राहील.
६) सहभागी महाविद्यालय संघाला एकांकिकेसाठी लागणारा सेट, रंगमंचावर लावणारे साहित्य, रंगभूषा व वेशभुषेसाठी लागणारे साहित्य इ. स्वत: आणावे लागेल.
७) विद्यापीठास पर्याप्त लाईट व आवश्यक इतर साहित्याची आगाऊ माहिती दिल्यानंतर त्याचा पुरवठा शक्य असल्यास पुरविला जाईल.
८) बॉक्स सेट वापरण्यास परवानगी नाही.
९) सादर करण्यात आलेल्या एकांकीकेच्या लेखकाची आवश्यक परवानगी, सेन्सॉर प्रमाणपत्रे इत्यादी घेण्याची जबाबदारी संबंधित सहभागी महाविद्यालयाची राहील.
१०) एकांकिकेचा दर्जा, विषय, अभिनय, निर्देशन, सादरीकरणाचा प्रभाव इ. च्या आधारावर परीक्षण केले जाईल.
**११) या स्पर्धेचे गुण युवारंग- २०२६ च्या निकालात गृहीत धरले जाणार नाहीत.**
१२) या स्पर्धेसाठी स्वतंत्र प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.

१३) पारितोषिक स्वरुप - या एकांकिका स्पर्धेचे स्वतंत्र पाहिरतोषिके दिले जातील ते खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| एकांकिका प्रथम | रु.7,001/- | रोख पारितोषिक व स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र |
| एकांकिका व्दितीय | रु.5,001/- | रोख पारितोषिक व स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र |
| एकांकिका तृतीय | रु.3,001/- | रोख पारितोषिक व स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र |
| एकांकिका उत्तेजनार्थ | रु.2,001/- | रोख पारितोषिक व स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र |

सदर स्पर्धेमध्ये आपला संघ सहभागी होण्यासाठी एकांकिकेची संहिता, आवश्यक हमीपत्रे सहभागी होणा-या विद्यार्थ्यांची माहिती sw@nmu.ac.in या मेलवर दि. २२ ऑक्टोबर, २०२६ पावेतो पाठवावी व हार्ड कॉपी महोत्सवाचा दिवशी दि. २७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यत नोंदणी कक्षात सादर करावी.

कळावे- धयवाद !

आपला विश्वासू,

**(प्रा. डॉ. प्रविण न. महाले)**
**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

**प्रत माहितीसाठी -**

१) डॉ. संजय काशिनाथ पाटील, जिल्हा समन्वयक, जळगाव जिल्हा, पंकज महाविद्यालय, चोपडा
२) डॉ. विवेकानंद लक्ष्मण चव्हाण, जिल्हा समन्वयक, धुळे जिल्हा, एस.पी.डी.एम.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर
३) डॉ. विजयप्रकाश ओमप्रकाश शर्मा, जिल्हा समन्वयक, नंदुरबार जिल्हा, पी.एस.जी.व्ही.पी.एस.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा
४) डॉ. सचिन पंडीत गाडेकर, विद्यापीठक्षेत्र समन्वयक, रसायनशास्त्र प्रशाळा., कबचौउमवि, जळगाव
५) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
६) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
७) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
८) विभागप्रमुख, कुलसचिव, कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
९) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया वृत्तपत्रात प्रसिध्दी दयावी.
१०) मा.पध्दती विश्लेषक संगणक केंद्र, संगणक प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया पत्रकास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.

Shivade/ Yuvarang Mahotsav 2026-27